दिनांक 28/01/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं.168

विषय – विटा नगरपरिषदेस सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना / नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना / महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत विकास कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 28/01/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) मा.आ. गोपीचंद पडळकर विधानसभा सदस्य महाराष्ट्र विधानसभा यांचे पत्र.

विटा नगरपरिषदेस सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना / नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना / महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत करणेत येणारी विकास काम खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.5 मधील पारे रोड (घुमटमाळ) येथील स्मशानभूमी येथे संरक्षक भिंत, पेव्हिंग ब्लॉक, बसण्याची जागा, दहन पिंजरा व सुशोभिकरणाचे वाढीव काम करणे.

तरी वरील कामांस महाराष्ट्र लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना / नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना / महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत अनुदान सन 2024-2025 मधील जिल्हा वार्षिक योजना निधीतून घेणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

तसेच सदर कामांपैकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेमधील कामांना मंजूरीकरीता महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.:नगरो-2015/प्र.क्र.232/नवि-33 मंत्रालय, मुंबई – 400032 दि. 16/05/2016 नुसार खालीलप्रमाणे सुधारणात्मक कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

1. नगरपरिषदेमध्ये व्दिनोंद लेखा पध्दतीचा अवलंब करणे.
2. नगरपरिषदेच्या कामकाजाचे पूर्ण संगणकीकरण करणे.
3. मालमत्ता कर विषयक विविध प्रकारच्या सुधारणा करणे.
4. नगरपरिषद हद्दीमध्ये पर्जन्य जल संचय (Rain Water Harvesting) करणे.
5. नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रात पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे.

तरी वरीलप्रमाणे सुधारणात्मक कार्यक्रम राबविणेस या ठरावाद्वारे मान्यता देणेत येत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा